प्रति,

संचालक,
डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन,
महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी - वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी,
पुणे

आमच्या नेटवर्क ऑफ वूमेन इन मीडिया या महिला पत्रकारांच्या संघटनेच्या सदस्या सफिना नबी यांना त्यांच्या 'द हाफ विडोज ऑफ काश्मीर' या स्क्रोलद्वारे २६ जानेवारी, २०२२ रोजी प्रकाशित झालेल्या वृत्तासाठी जाहीर करण्यात आलेला आपल्या संस्थेचा 'सामाजिक सहानुभूती, समज आणि सर्वसमावेशकता वाढवणारी पत्रकारिता' या श्रेणीतील पुरस्कार अचानक रद्द कृत्याचा आम्ही तीव्र निषेध करत आहोत.

आपल्या विद्यापीठाने सबळ कारण न देता अचानक हा पुरस्कार रद्द केला आणि त्यायोगे वृत्तपत्र स्वातंत्र्याप्रति अनास्था दर्शवली याबाबत आम्हाला खेद वाटतो.

सफिना नबी यांनी त्यांच्या उपरोक्त वृत्ताद्वारे ज्यांचे पती गायब झाले आहेत अशा दुर्दैवी काश्मिरी महिलांना पती गायब होण्याच्या घटनेस अनेक दशके झाल्यानंतर देखील मालमत्तेचे अधिकार नाकारल्याने त्यांची झालेली दुर्दशा उघडकीस आणली होती. सफिना नबी यांची त्यांच्या पत्रकारितेतील कौशल्य आणि विश्वासार्हतेसाठी जगभर ख्याती आहे.

हा पुरस्कार प्रदान करण्यामुळे आपली संस्था संघर्षग्रस्त भागातील वार्तांकनाचे महत्व अधोरेखित करते असे स्पष्ट झाले असते. उलटपक्षी, आपल्या जबाबदारी झटकण्यामुळे आपण पत्रकारितेच्या कशा प्रकारच्या प्रशिक्षणाचे समर्थन करता याचे प्रदर्शन झाले आहे.

आम्ही सफिना नबी यांचे पूर्ण समर्थन करतो आणि आपल्या विद्यापीठाने अभ्यासातील नीतिमत्तेचा स्वीकार करून पुरस्कार रद्द करण्याचा निर्णय मागे घ्यावा व सफिना नबी यांची जाहीर माफी मागून त्यांना त्यांच्या हक्काचा पुरस्कार प्रदान करावा अशी आग्रही मागणी करतो.

नेटवर्क ऑफ वूमेन इन मीडिया, इंडिया
२० ऑक्टोबर, २०२३